# राष्ट्रीय सेवा योजना

## पर्यावरण संवर्धन एवं नारी सम्मान

(Environmental Conservation & Women Dignity)




संपादक

प्रा. डॉ. अनिल दिगंबर वाडकर

Late.Ramesh Warpudkar College
Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

# राष्ट्रीय सेवा योजना
# पर्यावरण संवर्धन एवं नारी सम्मान
## (Environmental Conservation & Women Dignity)

: मार्गदर्शक :

**प्राचार्य डॉ. महेश्वर मल्लिकार्जून बेटकर**

: संपादक :

**प्रा. डॉ. अनिल दिगंबर वाडकर**
रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी,
अर्थशास्त्र विभागप्रमुख
श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा

अरुणा प्रकाशन, लातूर

# राष्ट्रीय सेवा योजना पर्यावरण संवर्धन एवं नारी सम्मान

संपादक – प्रा. डॉ. अनिल दिगंबर वाडकर

ISBN 978-93-91689-18-6

अरूणा प्रकाशन

१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर
मो. ९४२१४८६९३५, ९४२१३७१७५७

© सर्व हक्क लेखकाधिन

: प्रथम आवृत्ती :- डिसेंबर २०२१

: मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर

अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्यूटर, लातूर

मुखपृष्ठ रेखाटन :- विरभद्र गुळवे

मूल्य : ६००.०० रुपये

* 'राष्ट्रीय सेवा योजना पर्यावरण संवर्धन एवं नारी सम्मान' या पुस्तकातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्या संबंधी प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१. राष्ट्रीय सेवा योजना अर्थ, स्वरूप, व्याप्ती व महत्व ............ १३
प्रा.डॉ.अनिल दिगंबर वाडकर

२. बुडता जन हे न देखवे डोळा ............ २६
प्राचार्य डॉ. वेदश्री विजय थिगळे

३. भारतीय संस्कृती आणि पर्यावरण ............ ३०
डॉ. भाग्यश्री सुधीर भलवतकर

४. आपत्ती व्यवस्थापन व राष्ट्रीय सेवा योजना ............ ३६
प्रा.डॉ.अनिल दिगंबर वाडकर

५. शेतकरी आत्महत्या : कारणे, परिणाम आणि उपाय ............ ४०
प्रा. डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे

६. पर्यावरण संवर्धन आणि राष्ट्रीय सेवा योजना ............ ४७
प्रा.डॉ.अनिल दिगंबर वाडकर

७. वारकरी संताच्या साहित्यातील पर्यावरणीय दृष्टीकोन ............ ५३
प्रा. सुधीर गरड

८. युवकांच्या सर्वांगीण विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका ....... ५८
प्रा.डॉ.अनिल दिगंबर वाडकर

९. नारायण सुर्वे के काव्य में जनवादी चेतना ............ ६४
डॉं. विद्या शशिशेखर शिंदे

१०. मूल खासी जनजातीय समाज में मानवीय मूल्य ............ ६९
डॉ. अनीता पंडा

११. नारी आत्मनिर्भर कैसे बने ............ ७२
सहा. प्रा. आशा कवाने

१२. संत मीराबाई और बहिणाबाई के काव्य में विश्वबंधुत्व की भावना .... ७५
डॉ. चित्रा मिलिंद गोस्वामी

१३. तनाव प्रबंधन आज की आवश्यकता ............ ७९
डॉ. गोकुला भालेराव

१४. विकलांग लोगों के प्रति सामाजिक और सरकारी जिम्मेदारी ......... ८६
प्रो.कल्पना गवली

१५. पत्रकारिता का सामाजिक दायित्व ............ ९३
डॉ. नागरत्ना एन. राव.

१६. संत कबीरदास और गुरूनानक के काव्य में भक्ति एवं समन्वय भावना ............ ९७
डॉ.पी.वी.शोभा

१७. जनसंख्या नियंत्रण के लिए सामाजिक जागरूकता ............ १०४
प्रगती भाऊराव हरले

१८. महिला सशक्तिकरण ............ ११०
प्रो. एन. शान्ति कोकिला

१९. महिलाओं की परिवर्तनशील अवस्था और भूमिका ............ ११७
डॉ.सुचेता पारकर

२०. देशभक्ति और राष्ट्रीय मूल्यो का संवर्धन ............ १२६
डॉ. वैशाली आनंद गोस्वामी

२१. नैतिक मुल्यों के संवर्धन मे युवाओंका योगदान ............ १४२
प्रा. विशाखा कासारे

२२. राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्र निर्माण का आदर्श संघटन ............ १४७
प्रा.डॉ.अनिल दिगंबर वाडकर

23. **How to boost ones immunity to fight any pandemic : with special reference to women** ............ 154
Dr. Carolline David

24. **The New Education policy 2020 of India** ............ 160
Dr. Carolline David

25. **Disaster management** ............ 168
Dr. Seema Rani

26. **Coronavirus: Mapping the Global Pandemic** ............ 187
Mita Mathur

27. **Ecofeminism in Kamala Markandaya's Nectar in a Sieve** ............ 190
Dr. Ahilya Bharatrao Barure

५.

# शेतकरी आत्महत्या : कारणे, परिणाम आणि उपाय

**प्रा. डॉ सुनिता आत्माराम टेंगसे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कै रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी, महाराष्ट्र.

आज भारत देशा समोर वेगवेगळी आव्हाने आहेत त्यात शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या हे एक मोठे आव्हान आहे. गेल्या दोन दशकापासून देशातील विविध राज्यातील शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्वीकारत आहेत, यात प्रामुख्याने पंजाब, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ व महाराष्ट्र ही राज्ये आहेत महाराष्ट्र हे पुरोगामी व विकासाच्या बाबतीत आघाडीवर असणारे राज्य आहे, परंतु गेल्या काही वर्षात शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात आत्महत्या करत आहेत, शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र चालू असून त्यात वाढच होत आहे हे चित्र चिंताजनक आहे .शेतकरी आत्महत्या करतो, शेतकऱ्याच्या गरजा शेतीतून पूर्ण होऊ शकत नाहीत,त्याला जीवन जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो आणि या संघर्षाचा अंत आत्महत्या ने होतो हे वास्तव आपल्याला मान्य करावे लागेल.प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ दुर्खिम यांनी *द सुसाईड* या ग्रंथात आत्महत्या संबंधित विचार व्यक्त केले आहेत त्यामध्ये आत्महत्याही हे एक सामाजिक तथ्य आहे इतर सामाजिक तथ्यां प्रमाणे आत्महत्या ही व्यक्ती बाह्य असून व्यक्तीवर त्याचा प्रभाव पडत असतो .आत्महत्या एक प्रक्रिया आहे.एनसायक्लोपीडीया ऑफ ब्रिटानिका मध्ये आत्महत्या च्या संदर्भात आत्महत्या ही आपल्या इच्छेनुसार मुद्दाम केले गेलेले आत्मदहन होय असे म्हटले आहे.

**शोधनिबंधाचे उद्दिष्टे**

१. महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या ची स्थिती अभ्यासणे.

२. शेतकऱ्यांच्या आत्महत्या मागील कारणांचा शोध घेणे ३.शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे परिणाम अभ्यासणे

४. शेतकरी आत्महत्ये वर प्रतिबंधात्मक उपाय सुचवणे उपाय सुचवणे



५. शेतकऱ्याच्या प्रश्नासंदर्भात शासन व समाजाची कोणती भूमिका असावी हे स्पष्ट करणे

**अध्ययन पद्धती**

सदरील शोध निबंध साठी द्वितीय स्त्रोत व निरीक्षण पद्धतीचा अवलंब करून उपयुक्त माहिती संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्रे, मासिके, इंटरनेटच्या साह्याने संकलित करून त्याआधारे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचारांची मांडणी करण्यात आलेली आहे

**गृहीतक**

शेतकऱ्यांच्या आत्महतेस दुष्काळ, कर्जबाजारीपणा, व शासनाची धोरने जबाबदार आहेत.

कृषीप्रधान देशामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा आकडा सुन्न करणारा आहे. त्यात आघाडीवर आहे महाराष्ट्र. राज्यामध्ये गेल्या काही वर्षात ७५ हजार शेतकरी कुटुंब प्रमुखांनी आत्महत्या केल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांची घरे उद्धवस्त होत आहेत. शेतीला पाणी नाही आणि पिकाला हमीभाव नाही. या दोन कारणामुळे ९५ टक्के शेतकऱ्यांच्या आत्महत्या आहेत. आशिया खंडातील मानसिक आजारावर काम करणाऱ्या बेंगलोर येंथील एका संस्थेने महाराष्ट्रातील आत्महत्यांची कारणमिमांसा करून आपला अहवाल केंद्राकडे पाठवला आहे.आर्थिकदृष्ट्या सुबत्ता असणाऱ्या महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या देशाला हादरवून सोडत आहेत. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची टक्केवारी दरवर्षी वाढतच आहे. शेतकऱ्यांच्या या आत्महत्यांची कारणे आणि उपाययोजना शोधण्यासाठी आशिया खंडातील सर्वात मोठी मानसिक आजारावर काम करणाऱ्या बेंगलोर येथील संस्थेने प्रझेंटेशन सादर केले आहे. त्याचा अहवाल केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे. महाराष्ट्रातील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. गेल्या दहा वर्षामध्ये निर्माण झालेली दुष्काळाची परिस्थिती, दुष्काळाच्या परिस्थितीमुळे घटलेले शेतीचे उत्पादन, तोट्यात येणारा शेती व्यवसाय, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती खालावली. कुटुंबाची जबाबदारी पार पाडण्यामध्ये अपयशी ठरत असलेला कुटुंबप्रमुख या सर्व कारणामुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढत चालले आहे.

कृषीप्रधान देशामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा आकडा सुन्न करणारा आहे. त्यात आघाडीवर आहे महाराष्ट्र. राज्यामध्ये गेल्या काही वर्षात ७५ हजार शेतकरी कुटुंब प्रमुखांनी आत्महत्या केल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांची घरे उद्धवस्त होत आहेत. शेतीला पाणी नाही आणि पिकाला हमीभाव नाही. या दोन कारणामुळे

९५ टक्के शेतकऱ्यांच्या आत्महत्या आहेत. आशिया खंडातील मानसिक आजारावर काम करणाऱ्या बेंगलोर येथील एका संस्थेने महाराष्ट्रातील आत्महत्यांची कारणमिमांसा करून आपला अहवाल केंद्राकडे पाठवला आहे.

आर्थिकदृष्ट्या सुबत्ता असणाऱ्या महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या देशाला हादरवून सोडत आहेत. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची टक्केवारी दरवर्षी वाढतच आहे. शेतकऱ्यांच्या या आत्महत्यांची कारणे आणि उपाययोजना शोधण्यासाठी आशिया खंडातील सर्वात मोठी मानसिक आजारावर काम करणाछ्या बेंगलोर येथील संस्थेने प्रझेंटेशन सादर केले आहे. त्याचा अहवाल केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे. महाराष्ट्रातील परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. गेल्या दहा वर्षामध्ये निर्माण झालेली दुष्काळाची परिस्थिती, दुष्काळाच्या परिस्थितीमुळे घटलेले शेतीचे उत्पादन, तोट्यात येणारा शेती व्यवसाय, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती खालावली. कुटुंबाची जबाबदारी पार पाडण्यामध्ये अपयशी ठरत असलेला कुटुंबप्रमुख या सर्व कारणामुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढत चालले आहे.

२०१२ पर्यंत महाराष्ट्रामध्ये २० हजार ५०४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. तर देशात २ लाख ८४ हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या होत्या. त्यानंतरच्या सहा वर्षात या आत्महत्यांच्या आकडेवारीमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. एकट्या महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण ७५ हजाराच्या घरात असल्याचे भीती व्यक्त केली जाते. विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या कुटुंबप्रमुखांनी आत्महत्या केल्याने ७५ हजार कुटुंब रस्त्यावर आले आहेत. त्यांच्या लेकराबाळांचे शिक्षण थांबले आहेत. मुलींचे विवाह लांबले गेले आहेत. सर्वाधिक आत्महत्या सिंचन नसल्यामुळे शेतकऱ्यांनी केल्या आहेत. जर सिंचन क्षेत्र वाढले तर मोठ्या प्रमाणावर आत्महत्या रोखण्यामध्ये यश मिळू शकते. सिंचन क्षेत्र वाढवण्यासह शेतकऱ्यांच्या उत्पादनाला हमीभाव दिला तर आत्महत्येचे प्रमाण नियंत्रणामध्ये येवू शकते. हे दोन प्रभावी उपाययोजना तातडीने राबवणे आवश्यक आहे असे अहवालामध्ये म्हटले आहे.

महाराष्ट्रामध्ये शेतकरी कुटुंबाची परिस्थिती अत्यंत विदारक अशी आहे. **शेतकरी आत्महत्या होण्याची ही ठळक कारणे** असली तरी महत्वाचे म्हणजे शेतकऱ्यांच्या हातात पैसा राहिला नाही,निसर्गचक्र बदलले, पावसाचा अंदाज लागत नाही, पिकाला हमीभाव नाही, जोडधंदा नाही, शेतीसाठी पाणी नाही, खाजगी सावकाराचा तगादा या प्रमुख कारणामुळे शेतकरी आत्महत्या करतो. शेतकऱ्यांच्या



झालेल्या आत्महत्येमध्ये ७५ टक्के आत्महत्या विषारी औषध पिवून झाल्या आहेत, तर ४ टक्के आत्महत्या गळफास घेवून झाल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र सरकार सकारात्मक विचार करत असून नॅशनल मेंटल सोल्युएशन बेंगलोर या संस्थेचा अहवाल सरकारला महत्वाचा दुवा ठरणार आहे.

२०१४ मध्ये मराठवाड्यात ५७४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र काही थांबलेले नाही.२०१५ मध्ये ७७८ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपविली आहे. त्यात औरंगाबाद जिल्ह्यात १०० ,जालना ४६, परभणी ५४, हिंगोली ३० ,उस्मानाबाद ११३,बिड २२३ ,नांदेड १४४, लातूर ६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्ह्याचा सर्वात कमी हिंगोली जिल्ह्यात झालेल्या आहेत.

देशातील आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे त्यामध्ये आर्थिक नैसर्गिक कारणांवरून समाजशास्त्री कारणांचा विचार करणे आवश्यक आहे.

शेतीला संपत्तीचे स्वरूप आले असून त्यातून सामाजिक विषमता व सामाजिक विघटनास सुरुवात झाली यातून शेतकरी आत्महत्येची समस्या निर्माण झाली त्याची कारणमिमांसा पुढीलप्रमाणे करता येईल

संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास: संयुक्त कुटुंब पद्धती व शेतीचा जवळचा संबंध आहे. शेतीची कामे संयुक्त कुटुंबात विभागली जातात, याचा एकमेकांवर ताण येत नाही .शेतकऱ्यांच्या जीवनात येणाऱ्या विविध संकटांना सामोरे जाताना संयुक्त कुटुंबात एकमेकांना मानसिक आधार दिला जात असे. परंतु आज आधुनिक युगात व्यक्ति स्वातंत्र्याच्या भावनेने परंपरागत कुटुंब विघटित होत गेली,परिणामी कुटुंबात परस्परांविषयी असणारी प्रेम, सेवा, सहानुभूती, त्याग, सहकार्य या भावनांचा क्षय होत आहे. परिणामी मानवाची संकटाला सामोरे जाण्याच्या क्षमतेवर विपरीत परिणाम झाला व शेतकऱ्यांकडून आत्महत्येचा स्वीकार मोठ्या प्रमाणात केला जात आहे.

व्यक्तिवादी दृष्टिकोन हा पारस्परिक भावनिक ओलावा शुष्क करत आहे .आधुनिक युगात यांत्रिकीकरणामुळे व्यक्ती जीवनात सुख आले सुविधा मिळाल्या परंतु मानवी मूल्यांचे पतन झाले. मानवी मनात स्वार्थी भावना वाढीस लागली व मानवी मने दुभंगली आणि व्यक्ती आत्मकेंद्री बनत गेला. त्यातूनच आत्महत्या करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली.

नागरीकरण, यांत्रिकीकरण, राजकारण्यांमुळे मानवातील संवाद नाहीसा झाला.

मानवी समाजाच्या गर्दीत माणूस एकटा पडल. सामाजिक ऐक्याच्या अभावामुळे आत्महत्येची प्रवृत्ती वाढीस लागली.

दिवसेंदिवस वाढत जाणारे पर्यावरण असंतुलन ओला वा कोरडा दुष्काळ यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत गेला. खर्च वाढला, महागाई वाढली, गरजा वाढल्या, शेतीचा खर्च वाढत गेला , उत्पादन व खर्च यांचा ताळमेळ बसणे शक्य न झाल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला, कर्जाची परतफेड करणे शक्य नसल्यामुळे मुद्दलावर व्याज वाढत गेले ,कर्जाचा डोंगर झाला नैराश्येमुळे शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्वीकारू लागला ही वास्तविकता मान्यच करावी लागते.

चंगळवादी प्रवृत्ती वाढीस लागली, मर्यादित उत्पादन व जास्तीचा खर्च यामुळे शेतकर्यांचे आर्थिक गणित चुकू लागले यातूनच ताणतणाव निर्माण होऊन आत्महत्येशिवाय पर्याय नाही ही भावना बळावत गेली व आत्महत्येचा मार्ग स्वीकारला .शेतकऱ्यांचे अज्ञान व पारंपरिक शेती हेसुद्धा शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण आहे .शेतकऱ्याला शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळत नाही, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी शेतकऱ्यांची पदोपदी अडवणूक करतात, त्यामुळे शासनाच्या योजनांचा लाभ मिळत नाही अडचणी वाढत जातात, कर्ज काढले जाते, सावकाराकडून पिळवणूक होते, परिणामी शेतकरी आत्महत्या करतो.

प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा, लग्न समारंभाचा वाढत जाणारा खर्च, ग्रामीण भागातील शेतकरी अंधश्रद्धाळू आहेत, ते पत नसताना सण-समारंभ परंपरांचे पालन करण्यासाठी कोंबड्या, बकरे कापुन जेवणावळी घालने, सवास्न जेव घाले नवस करणे, नवस फेडणे, अभिषेक करणे अशा छोट्या-मोठ्या स्वरूपाचा खर्च होत जातो. व्यापाऱ्याकडे उधारी करून हे सर्व लहान-मोठे कार्यक्रम आजही बिकट परिस्थितीत केले जातात. उधारी फेडण्यासाठी शेती गहाण ठेवली जाते. लग्नाच्या वेळी ऐपतीपेक्षा जास्त खर्च करून आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना यातून बाहेर पडणे शक्य दिसत नाही, परिणामी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला जातो.

शेतीपूरक व्यवसायाचा अभाव मराठवाड्यात जाणवतो. शेतकरी फक्त शेती करतो ,शेतीत नुकसान झाल्यास यातून बाहेर येण्यासाठी दुसरा कोणताही आधार शेतकऱ्यास नसतो. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी रस्त्यावर येतो. व्यसनाधीनता, तंबाखू, गुटखा खाल्ल्यामुळे जीवनात नैराश्य येते व तो आत्महत्येस प्रवृत्त होतो .

मराठवाड्यात बहुतांशी प्रमाणात कोरडवाहू शेती केली जाते जलसिंचनाच्या सुविधा नसल्यामुळे बागायत शेती करता येत नाही. मराठवाड्यातील काही जिल्ह्यात



दुष्काळाची स्थिती नेहमीच असते त्यामुळे बारमाही शेती करता येत नाही,अशा विविध नैसर्गिक व सामाजिक कारणांमुळे शेतकऱ्याच्या अडचणी वाढत जातात व शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होतो.

शेतकऱ्यांना कौटुंबिक स्तरावर होणाऱ्या संघर्षास मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागते, आर्थिक अडचणीत व्यसनाधीन त्यामुळे कौटुंबिक संघर्ष आणि घालवता त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनावर होतो .५५ टक्के शेतकरी कौटुंबिक संघर्षातून आत्महत्या करतात असे आढळून आले आहे.

जमिनीच्या तुकडीकरणात वाढ होत आहे .लोकसंख्येची वाढ आणि गणिती पद्धतीने होते व जमिनीचे क्षेत्र भुमीतीय पद्धतीने घटत जाते. सद्यपरिस्थितीत मराठवाड्यातील गावात ९५ टक्के शेतकऱ्यांना एक हेक्टिरपेक्षा कमी क्षेत्र असलेले दिसून येते. शेतकऱ्याला सर्व गरजा भागविण्यासाठी शेतीवर अवलंबून राहावे लागते .अल्प क्षेत्रामुळे आधुनिक तंत्रज्ञान, बैलजोडी, अवजारे ठेवणे शक्य होत नाही ,परिणामी शेतकऱ्यास परावलंबी जीवन जगावे लागते.

भारतातीलतील साधासरळ, अज्ञानी, निरक्षर शेतकरी सावकाराकडून, व्यापाऱ्याकडून, राजकारण्यांकडून, बी बियाणे, खतांच्या कंपन्यांकडून, दुकानदारांकडून फसवला जातो, त्याची पीळवणूक केली जाते. त्याच्या उत्पादन- खर्चाचा मेळ बसत नाही. शेतकऱ्यांच्या शेतमालाचा हमीभाव दिला जात नाही. शेतकऱ्याकडे उत्पादन झाले की बाजारपेठेत किंमत ढासाळतात त्याच्या हातात काहीच शिल्लक राहत नाही, अशा वेळी स्वतःच्या व कुटुंबीयांच्या गरजा कशा भागवायच्या या विवंचनेत शेतकरी आत्महत्या करतो.

पूर, दुष्काळ, कर्ज, सुधारित बियाण्याचा वापरन करने, सार्वजनिक आरोग्य, कमी प्रमाणात कीटकनाशकांचा वापर ई. विविध कारणांमुळे शेतकरी आत्महत्या करतो

**शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या थांबवण्यासाठी उपाय योजना**

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार, शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करणे, शेतकऱ्यांचे प्रबोधन करणे, ग्रामीण भागात शेती पूरक व्यवसाय यांना चालनादेणे, ग्रामीण भागात सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करणे, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम शासनाने तातडीने हाती घेणे, शेततळे जलसंधारणासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे ,ग्रामीण भागात बचत गट संस्थेद्वारे कमी दरात कर्ज पुरवठा करणे, ग्रामीण भागात कृषीपूरक व्यवसाय करण्यास चालना देणे,गट शेती पद्धतीचा अवलंब करण्यास

प्रोत्साहित करणे, पीक पद्धतीत बदल करणे, कृषी मालाला हमी भाव देणे ,अल्पदरात कर्ज पुरवठा करणे, पीक पद्धतीत बदल करणे, शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची व्यवस्थित नियोजन करणे, ठिबक सिंचन, तुषार सिंचन यासारख्या सोयी सुविधा निर्माण करणे, समारंभ होणाऱ्या खर्चास प्रतिबंधक घालणे ई.

**सारांश**

गावातील शेतकरी, सुज्ञ नागरिक ,तरुण, सुशिक्षित, नोकरदार यांनी एकत्र येऊन पाणी आडवा पाणी जिरवा, स्वच्छता ,शिक्षण, आरोग्य या बाबींना प्राधान्य द्यावे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा शेती हा खऱ्या अर्थाने आधारस्तंभ बनवावा, कारण की शेती जगली तर माणसे जगतील आणि माणसे जगतील तर तब्येत औद्योगीकरण यांत्रिकीकरण संशोधन विज्ञान तंत्रज्ञान हे सर्व सत्य असले तरी यातून अन्नधान्य निर्मिती होणे शक्य नाही म्हणूनच शेतकऱ्याला वाचविण्यासाठी शेतकऱ्याच्या रक्षणासाठी शेतीला जगविण्यासाठी शेतीच्या सुरक्षिततेसाठी सुपीकतेसाठी अन्नधान्य निर्मिती व वृद्धीसाठी सर्वंकष प्रयत्नांची गरज आहे.

**संदर्भसूची**


१. डॉ.दयानंद ऊजळंबे, निसर्गवेध, अरुणा प्रकाशन ,लातूर ,जून २०१५ पान नं. ९८ ते १००
२. Manuavlok research bulletin 3 oct 2015 page no35 Vo 37
३. Imbalance of education in Maharashtra Harshvardhan publication limba Ganesh January 2015 page no.85 to88
४. डॉ. मारुती कच्छवे संपादक भारतीय शेती व जागतिकीकरण न्यू मॅन पब्लिकेशन परभणी, मार्च २०१३, पान नं.७२ ते ७७
५. वृक्षवेली जानेवारी ते जून २०१३ पान नं. ४० ते ४३
६. लोकराज्य मे २०१२ पान नं.२७
७. दै. सकाळ सप्त रंग बुडते हे जन न देखवे डोळाउत्तम कांबळे
८. printing area international multi-lingual research journal issue 16 volume 1 -pril 2016 page no. 81-84
९. दै. सकाळ २५ फेब्रुवारी २०१६
१०. https://www.maxmaharashtra.com/max kisan
११. https://en.m.wikipedia.org/wiki/Farmer%27šsuicidešinšindia


***

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani